दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | बुधवार दि.१८ नोव्हेंबर २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ४ थे | अंक ५८ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Wednesday 18 November 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 04 | Issue 58 | Pages 4 | Rate 4 Rs

ल स्वाभिमानीचे ऊस दर आंदोलन ३ दिवसांसाठी स्थगित

मुंबई–ऊस दराच्या पहिल्या उचलीवरून सोलापूर जिल्ह्यात सुरू झालेले स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे आंदोलन अखेर तीन दिवसांसाठी तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी १९ नोव्हेंबरला पालकमंत्री आणि कारखानदारांसोबत बैठक आयोजित केली असून, तोपर्यंत कारखाने बंद ठेवण्याचे आदेश दिल्याने राजू शेट्टी यांनी हा निर्णय घेतला आहे. मात्र, जर या बैठकीत कारखानदारांनी आमची फसवणूक केली, तर त्यांना बाहेर पडू देणार नाही आणि महामार्ग तसेच रेल्वेही रोखू, असा इशारा राजू शेट्टी यांनी दिला आहे.आंदोलनाची भूमिका स्पष्ट करताना राजू शेट्टी म्हणाले, कारखाने सुरू होऊन दीड महिना झाला तरी कारखानदार दराबाबत बोलायला तयार नव्हते. कर्नाटक आणि महाराष्ट्रातील फॉर्म्युल्यानुसार, तसेच सोलापूर जिल्ह्याची साखरेची रिकव्हरी पाहता, आम्ही ३,५०० रुपये ही पहिली उचल अतिशय रास्तपणे मागितली होती. कर्नाटकात शेजारचे कारखाने ३,७०० रुपये देत आहेत.

ते त्यांच्या नेत्यासाठी बोलतात मी माझ्या काकांसाठी बोलतोय

नेत्याने उत्तर दिल्यावर मी बोलेन-रोहित पवार

दिवंगत नेते अजित पवार यांच्या विमान अपघातावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केलेल्या आरोपांनंतर भाजप नेते आणि आमदार सत्यजीत तांबे यांनी केलेल्या टीकेला राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सडेतोड प्रत्युत्तर दिले आहे. मी कालच्या सादरीकरणाच्या माध्यमातून सत्तेत असलेल्या मोठ्या नेत्यांना प्रश्न विचारले आहेत, कार्यकर्त्यांना नाही. जे नेत्यांचे भक्त आहेत किंवा नेत्याला खूश करण्यासाठी बोलतात, त्यांच्या विधानांना मी उत्तर देत नाही. ते त्यांच्या नेत्यासाठी बोलतात आणि मी माझ्या काकांसाठी बोलतोय; जेव्हा त्यांचे मोठे नेते उत्तर देतील, तेव्हाच मी पुढे बोलेन, अशा शब्दांत रोहित पवार यांनी जोरदार पलटवार केला आहे. मंगळवारी बाळासाहेब ठाकरे यांच्या १४ व्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी पार्क येथील स्मृतिस्थळाचे दर्शन घेतल्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते.



दैनिक वादळ वार्ता
मुंबई (वृत्तसंस्था)

सत्यजीत तांबे यांनी फेसबुक पोस्ट लिहून अजित पवार व देवेंद्र फडणवीस यांच्या मैत्रीची आठवण करून देत रोहित पवारांना सबुरीने घेण्याचा सल्ला दिला होता. यावर विचारले असता रोहित पवार यांनी तांबे यांचा 'कार्यकर्ता' असा उल्लेख करत खोचक टोला लगावला. मी काल सत्तेतील नेत्यांना प्रश्न विचारले आहेत, तुम्ही कार्यकर्त्यांची नावे घेत आहात. मी मोठ्या नेत्यांना फॉलो करतो; प्रत्येक जण ट्विट किंवा पोस्ट करत असतो, ते सर्वच मी वाचले पाहिजे किंवा फॉलो केले पाहिजे, असे मला वाटत नाही, असे म्हणत त्यांनी तांबे यांच्या सल्ल्याला फारसे महत्त्व देण्याचे टाळले.भाजप नेते प्रसाद लाड यांनी शरद पवार यांना पत्र लिहून पक्षाची भूमिका स्पष्ट करण्याची मागणी केली होती, तर सुप्रिया सुळे यांनी पत्रकार परिषदेची कल्पना नसल्याचे म्हटले होते. यावर बोलताना रोहित पवार म्हणाले की, कालच्या पत्रकार परिषदेत एका पत्रकाराने मला हाच प्रश्न विचारला होता आणि त्याला मी तिथेच सविस्तर उत्तर दिले आहे; तेच उत्तर मी पुन्हा देणार नाही. माझी बांधिलकी विचारांशी, अजितदादांशी आणि महाराष्ट्रातील सामान्य जनतेशी आहे. ज्यांची बांधिलकी केवळ नेत्यांशी आहे, त्यांना उत्तर देण्याची गरज मला वाटत नाही. तसेच, आज बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिस्थळाचे दर्शन घेण्यासाठी आलो असल्याने इथे कोणतेही राजकीय वक्तव्य करणार नाही, योग्य वेळी योग्य ठिकाणी उत्तर देईन, असे त्यांनी स्पष्ट केले.

चारा पिके आणि पिण्याच्या पाण्यासाठी उजव्या कालव्याचे आवर्तन आवश्यक

जायकवाडीच्या पाणीप्रश्नी आमदार डॉ.गुट्टे यांची जलसंपदामंत्र्यांकडे लेखी मागणी

दैनिक वादळ वार्ता
गंगाखेड । गोपाळकृष्ण पाळवदे



विधानसभा मतदारसंघातील चारा पिकांचे नुकसान आणि ४५ गावांतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. त्यामुळे जायकवाडी प्रकल्पाच्या उजव्या कालव्याद्वारे पाण्याचे एक आवर्तन तातडीने सोडण्यात यावे. शिवाय या संदर्भात स्वतंत्र बैठक घेऊन तातडीने आवर्तन सोडण्याचे आदेश देण्याची विनंतीवजा आग्रही मागणी स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे मुंबई येथे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. तसेच संभाव्य पाणीटंचाईची तीव्रता वाढण्यापूर्वीच शासनाने हस्तक्षेप करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.जायकवाडी प्रकल्पासंदर्भात जलसंपदामंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीमध्ये उजव्या कालव्याद्वारे पाणी सोडण्याचा विषय चर्चेला आला होता. त्यावेळी या प्रश्नावर स्वतंत्र बैठक आयोजित करून उजव्या कालव्याला पाण्याचे एक आवर्तन देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यामुळे यापूर्वी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने आता प्रत्यक्ष निर्णय घेऊन पाणी सोडण्याची कार्यवाही करावी, अशीही अपेक्षा आ.डॉ.गुट्टे यांनी व्यक्त केली.

सद्यस्थितीत परिसरातील चारा पिकांना पाण्याची नितांत आवश्यकता आहे. मात्र, पाण्याअभावी चारा पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून त्याचा थेट परिणाम पशुपालकांच्या अर्थकारणावर होण्याची शक्यता आहे. ग्रामीण भागातील शेती आणि पशुधन हे परस्परपूरक घटक असल्याने चारा उपलब्धतेचा प्रश्न केवळ शेतीपुरता मर्यादित राहत नाही, तर त्याचा परिणाम दूध उत्पादन, पशुपालन आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नावरही होतो. त्याचबरोबर परिसरातील ४५ गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी कालव्याचे आवर्तन सोडण्याची मागणी होत असल्याने या प्रश्नाला प्राधान्य देण्याची गरज निर्माण झाली आहे, असेही आ.डॉ.गुट्टे यांनी स्पष्ट केले.

दरम्यान पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होण्यापूर्वी जलसंपदा विभागाने नियोजनबद्ध आणि तातडीची कार्यवाही करावी, अशी भूमिका आमदार डॉ. गुट्टे यांनी मांडली आहे. त्यासाठी जलसंपदामंत्र्यांनी स्वतंत्र बैठक आयोजित करून जायकवाडी प्रकल्पाच्या उजव्या कालव्याला एक आवर्तन सोडण्यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक आदेश द्यावेत, अशीही मागणी त्यांनी केली.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाला राष्ट्रवादी महिला आघाडीचा 'हात'!

समान काम-समान वेतनाच्या मागणीला नसरीन बागवान यांचा जाहीर पाठिंबा



दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

समान काम-समान वेतनासह विविध प्रलंबित मागण्यांसाठी केज व अंबाजोगाई येथील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी सुरू केलेल्या ठिय्या आंदोलनाला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) बीड जिल्हा महिला आघाडीच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे. महिला जिल्हाध्यक्षा नसरीन बागवान यांनी अधिकृत पत्रक प्रसिद्ध करून कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना समर्थन दर्शविले. मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर २०२६ रोजी सुरू असलेल्या या आंदोलनाची शासनाने तातडीने दखल घेऊन न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्या मान्य कराव्यात, अशी मागणी नसरीन बागवान यांनी केली. राज्यातील नोकरदार, व्यावसायिक, शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना आपल्या मागण्यांसाठी आंदोलन व उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागत आहे, ही खेदाची बाब असल्याचे त्यांनी पत्रकात नमूद केले.दरम्यान, नसरीन बागवान यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन न्यायालयीन कर्मचारी तसेच महिला कर्मचाऱ्यांशी आस्थेवाईकपणे संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. शासनाने आंदोलनाची गांभीर्याने दखल घेऊन प्रलंबित मागण्यांवर लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.



वादळी चिमटा

दुष्काळ केला जाहीर, घोषणांचा उडाला बार,
शेतकऱ्यांच्या पदरी मात्र आश्वासनांचा भार!
मदतीच्या नावाखाली कागदांचा बाजार,
बळीराजा विचारतो, कधी मिळणार आधार?

शिवसेना पक्षप्रमुख हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन केले

दैनिक वादळ वार्ता
अर्धापूर । आनंदराव मोरे

अर्धापूर तालुक्यातील वसमतफाटा चौकात शिवसेना पक्षप्रमुख हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त १७ नोव्हेंबर रोजी वसमतफाटा चौकात येथे पुष्पहार घालून त्यांना अभिवादन करण्यात आले.अर्धापूर तालुक्यातील शिवसेना पक्षप्रमुख हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथीच्या अभिनंदन करताना ठाकरे गटाचे नांदेड जिल्हाप्रमुख बबनराव बारसे सुनिल कदम बालाजी पेनूरकर राजेश डाखोरे माजी उपसभापती अशोक कपाटे ॲड रविकिरण शिंदे अमोल बारसे सतोष कदम आशोक डांगे रमेश क्षीरसागर चेतन देशमुख शेख रफिक ओम नागलमे होनाजी जोगदंड प्रसाद दाळपुसेआदी शिवसेना ठाकरे गटाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने अभिवादन करण्यात साठी उपस्थित होते.



संपादकीय

राज्यातील भेसळ मात्र नेत्यांची मिसळ!

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या एक वेगळेच चित्र पाहायला मिळत आहे. सामान्य माणसाच्या ताटात काय पडते, बाजारात मिळणाऱ्या वस्तूंमध्ये किती भेसळ आहे, शेतकऱ्यांच्या मालाला किती भाव मिळतो, तरुणांच्या हाताला रोजगार आहे की नाही, यापेक्षा राजकीय नेत्यांच्या सत्तेची समीकरणे जुळवण्यातच राजकारण अधिक गुंतलेले दिसते. राज्यात खाद्यपदार्थांपासून दूध, तेल, मसाले आणि जीवनावश्यक वस्तूंपर्यंत भेसळीच्या तक्रारी ऐकायला मिळतात; मात्र राजकारणात तर भेसळीचा नवा विक्रमच सुरू असल्याचे चित्र आहे. विचारधारा एका पक्षाची, निष्ठा दुसऱ्या पक्षाची आणि सत्तेचा लाभ तिसऱ्याच दिशेने, अशी नेत्यांची राजकीय मिसळ जनतेच्या चर्चेचा विषय बनली आहे.एके काळी राजकारणात पक्षनिष्ठा, विचारधारा आणि कार्यकर्त्यांच्या त्यागाला महत्त्व होते. आज मात्र निवडणुकीचे गणित, सत्तेची खुर्ची आणि राजकीय सोय यांनाच अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. कालपर्यंत एकमेकांवर भ्रष्टाचाराचे आरोप करणारे नेते आज सत्तेच्या व्यासपीठावर शेजारी बसलेले दिसतात. काल ज्यांना जनतेसमोर दोषी ठरवले, त्यांच्याच गळ्यात आज मैत्रीचा हार घातला जातो. निवडणुकीच्या काळात एकमेकांविरोधात दंड थोपटणारे नेते निकालानंतर सत्तेच्या समीकरणात सहजपणे एकत्र येतात. मग प्रश्न पडतो की, कालचे आरोप खरे होते की आजची मैत्री खरी आहे? की दोन्ही वेळा जनतेची दिशाभूल करण्याचा राजकीय खेळ सुरू होता?सामान्य माणसाच्या आयुष्यात मात्र या राजकीय मिसळीचा कोणताही गोडवा उतरलेला नाही. महागाईचा तडका कायम आहे, बेरोजगारीची झळ तरुणांना बसत आहे, शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबला आहे आणि सर्वसामान्य नागरिक मूलभूत सुविधांसाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवत आहे. निवडणुकीच्या वेळी आश्वासनांची खैरात केली जाते; मात्र सत्ता मिळाल्यानंतर त्याच आश्वासनांचे काय होते, याचा हिशेब जनतेला मिळत नाही. नेत्यांच्या पक्षबदलाला राजकीय रणनीती म्हटले जाते; पण सामान्य कार्यकर्त्याने निष्ठा बदलली तर त्याला संधीसाधू ठरवले जाते. हा दुटप्पीपणा नेमका कोणत्या लोकशाहीचा भाग आहे? खाद्यपदार्थांतील भेसळ आरोग्यासाठी घातक असते, तर राजकारणातील विचारधारेची भेसळ लोकशाहीच्या आरोग्यासाठी घातक ठरते. लोकशाहीत पक्ष बदलण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे; मात्र जनतेला दिलेल्या आश्वासनांचे काय? मतदारांनी एका विचारधारेवर विश्वास ठेवून मतदान केले असेल, तर सत्तेच्या सोयीसाठी होणाऱ्या राजकीय बदलांचे उत्तर देण्याची जबाबदारीही नेत्यांचीच आहे. पक्ष कोणताही असो, सत्ताधारी असो वा विरोधक, जनतेच्या प्रश्नांवर त्यांची भूमिका स्पष्ट असली पाहिजे.आज महाराष्ट्राला नेत्यांची राजकीय मिसळ नको, तर जनतेच्या प्रश्नांवर एकजूट हवी आहे. पक्षनिष्ठेपेक्षा जननिष्ठा मोठी ठरली पाहिजे. सत्तेच्या खुर्चीसाठी होणाऱ्या राजकीय जोडतोडीपेक्षा शेतकऱ्यांच्या शेतात पाणी, तरुणांच्या हाताला रोजगार, महिलांना सुरक्षितता आणि सामान्य माणसाला महागाईतून दिलासा मिळणे महत्त्वाचे आहे. बाजारातील भेसळ रोखण्यासाठी जशी अन्न व औषध प्रशासनाची कठोर कारवाई आवश्यक आहे, तशीच राजकारणातील संधीसाधूपणा रोखण्यासाठी जनतेच्या जागरूकतेची गरज आहे. कारण नेत्यांची मिसळ कितीही रंग बदलो, शेवटी लोकशाहीचा खरा मालक मतदारच आहे. निवडणुकीत मत देताना जनतेनेही आता चेहरा नव्हे, तर चारित्र्य, विचार आणि कामाचा हिशेब मागितला पाहिजे. अन्यथा बाजारात भेसळ आणि राजकारणात मिसळ, या दोन्हींचा फटका सामान्य जनतेलाच बसत राहील!

शेत पाणंद रस्त्यांच्या विकासा साठी विजयकांत मुंडे सज्ज

वरिष्ठ नेतृत्वाचे मानले आभार ;शेतकऱ्यांचे रस्त्यांचे प्रश्न मार्गी लावण्याचा निर्धार

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेंतर्गत केज विधानसभा मतदारसंघाच्या सह-अध्यक्षपदी विडा जिल्हा परिषद गटाचे माजी सदस्य विजयकांत विक्रमराव मुंडे यांची अधिकृत निवड करण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री पंकजाताई मुंडे आणि आमदार नमिताताई मुंदडा यांचे आभार मानले आहेत.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेनुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. मंत्री पंकजाताई मुंडे व माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आमदार नमिताताई मुंदडा यांच्या नेतृत्वाखाली विजयकांत मुंडे यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतीमाल बाजारपेठेत पोहोचविण्यासाठी तसेच शेतीच्या कामांसाठी बारमाही पक्क्या शेत पाणंद रस्त्यांची आवश्यकता आहे. अनेक ठिकाणी कच्चे व अतिक्रमित पाणंद रस्ते असल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीतून हे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे विजयकांत मुंडे यांनी सांगितले.
केज विधानसभा मतदारसंघातील शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत योजनेचा लाभ पोहोचविणे, पाणंद रस्त्यांचा विकास करणे आणि शेतकऱ्यांच्या दळणवळणाचा प्रश्न मार्गी लावणे हे आपले प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या निवडीमुळे केज तालुक्यासह विडा जिल्हा परिषद गटातील कार्यकर्ते व शेतकरी वर्गात उत्साहाचे वातावरण असून, त्यांच्या नियुक्तीचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

वरिष्ठ नेतृत्वाने माझ्यावर दाखविलेला विश्वास सार्थ ठरवत सोपविलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडणार आहे. केज विधानसभा मतदारसंघातील शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत योजनेचा लाभ पोहोचवून शेत पाणंद रस्त्यांच्या विकासाला गती देणे हेच माझे ध्येय आहे.
– विजयकांत मुंडे
सह-अध्यक्ष, मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना, केज विधानसभा मतदारसंघ.



मुंबई जिल्हा को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फेडरेशनवर सहकार पॅनेलची एकहाती सत्ता

अध्यक्षपदी प्रकाश दरेकर, उपाध्यक्षपदी यशवंत (भाई) सावंत, सचिवपदी आशिष गोयल तर खजिनदारपदी विजय शेलार यांची बिनविरोध निवड

दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

मुंबई जिल्हा को-ऑऑपरेटिव्ह हाऊसिंग फेडरेशन लिमिटेडच्या पंचवार्षिक सार्वत्रिक निवडणुकीत सहकार पॅनेलने आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले असून, पॅनेलचे सर्व २१ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यानंतर आज पार पडलेल्या पदाधिकारी निवडणुकीत अध्यक्षपदी नगरसेवक प्रकाश दरेकर, उपाध्यक्षपदी मुंबई काँग्रेस सहकार सेलचे अध्यक्ष यशवंत (भाई) सावंत, सचिवपदी आशिष गोयल आणि खजिनदारपदी विजय शेलार यांची बिनविरोध निवड करण्यात आली.प्रवीण भाऊ दरेकर, शिवाजीराव नलावडे, सिद्धार्थ कांबळे, नंदकुमार काटकर, प्रसाद लाड आणि सुनील राऊत यांच्या नेतृत्वाखाली सहकार पॅनेलने ही निवडणूक लढवली. मुंबईतील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या प्रतिनिधित्व करणाऱ्या या महत्त्वपूर्ण फेडरेशनवर सहकार पॅनेलने पुन्हा एकदा आपली पकड मजबूत केली आहे.
उपाध्यक्षपदी निवड झालेले यशवंत (भाई) सावंत हे मुंबई काँग्रेस सहकार सेलचे अध्यक्ष असून, सहकार क्षेत्रातील त्यांचा प्रदीर्घ अनुभव आणि गृहनिर्माण संस्थांच्या प्रश्नांवरील सातत्यपूर्ण कार्य यामुळे त्यांच्या निवडीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यांच्या बिनविरोध निवडीमुळे सहकार क्षेत्रातील विविध घटकांना एकत्र घेऊन काम करण्याची नवी संधी निर्माण झाली आहे.



गृहनिर्माण संस्थांच्या प्रश्नांना मिळणार नवी दिशा
मुंबईतील सहकारी गृहनिर्माण संस्थांना भेडसावणारे पुनर्विकास, लेखापरीक्षण, कायदेशीर मार्गदर्शन, निवडणूक प्रक्रिया, व्यवस्थापन, देखभाल-दुरुस्ती आणि सभासदांचे अधिकार यांसारखे प्रश्न सोडविण्यासाठी फेडरेशनची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. नवनिर्वाचित अध्यक्ष प्रकाश दरेकर आणि त्यांच्या सहकारी पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून फेडरेशनचे कामकाज अधिक प्रभावीपणे पुढे नेण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.सर्व २१ संचालकांची बिनविरोध निवड आणि त्यानंतर चारही प्रमुख पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड झाल्याने सहकार पॅनेलमधील एकजूट अधोरेखित झाली आहे. या निवडीमुळे मुंबईच्या सहकारी गृहनिर्माण क्षेत्रात आनंदाचे वातावरण असून, नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

नवी मुंबई कॉमिक कॉनच्या पहिल्या आवृत्तीत रॅपर फरहान खान आणि उर्जिता वाणी यांची उपस्थिती

दैनिक वादळ वार्ता
नवी मुंबई । प्रतिनिधी

कॉमिक कॉन इंडिया पहिल्यांदाच नवी मुंबईत पॉप-कल्चर महोत्सवाचे आयोजन करणार आहे. 'मारुती सुझुकी प्रस्तुत, क्रंच्यरोलद्वारे समर्थित नवी मुंबई कॉमिक कॉन' हा महोत्सव २८ आणि २९ नोव्हेंबर २०२६ रोजी सीआयडीसीओ एक्झिबिशन अँड कन्व्हेन्शन सेंटर येथे रंगणार आहे.
या पहिल्या आवृत्तीत विनोद आणि संगीताच्या मनोरंजक कार्यक्रमांसह, भारतीय कलाकारांच्या कलाकृतींचे प्रदर्शन करणारा 'आर्टिस्ट ॲली', संवादात्मक चर्चासत्रे, कॉस्प्ले स्पर्धा आणि अशा अनेक आकर्षक उपक्रमांचा समावेश असेल. मनोरंजन, सर्जनशीलता आणि पॉप-कल्चरचा अनोखा अनुभव देणारा हा महोत्सव चाहत्यांसाठी खास पर्वणी ठरणार आहे.या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण म्हणजे भारतातील कॉमिक बुक आणि ग्राफिक नॉव्हेल क्षेत्राचा गौरव. या निमित्ताने होली काऊ एंटरटेनमेंट, बुल्सआय प्रेस, याली ड्रीम क्रिएशन्स आणि इंडसव्हर्स यांसारखे आघाडीचे प्रकाशक व निर्माते सहभागी होणार आहेत. याशिवाय प्रसिद्ध कलाकार राजेश नागुलकोंडा यांचीही उपस्थिती असेल. भारतीय कलाकार आणि कथाकारांना त्यांच्या स्वतंत्र कलाकृती सादर करण्यासाठी, चाहत्यांशी संवाद साधण्यासाठी आणि आपल्या कामाला व्यापक प्रसिद्धी मिळवून देण्यासाठी कॉमिक कॉन एक महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे.





नायरी मोहल्ल्यात भीषण आग कौलारू घर संसारासह जळून खाक

दैनिक वादळ वार्ता
संगमेश्वर । प्रतिनिधी

संगमेश्वर तालुक्यातील नायरी मोहल्ला येथे मध्यरात्रीच्या सुमारास लागलेल्या भीषण आगीत नियाज पाटणकर आणि जाकीर पाटणकर यांचे कौलारू घर पूर्णपणे जळून खाक झाले. आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केल्याने संपूर्ण घर आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. घरातील साहित्यांसह संपूर्ण वास्तू बेचिराख झाली असून मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. सुदैवाने घरात कोणीही नसल्याने जीवितहानी टळली.मिळालेल्या माहितीनुसार, नायरी मोहल्ला येथील पाटणकर यांचे कौलारू घर बंद होते. मध्यरात्री अचानक या घराला आग लागली. आगीची माहिती मिळताच देवरुख येथील अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. मात्र, अग्निशमन दल घटनास्थळी दाखल होण्यापूर्वीच आगीने संपूर्ण घराला वेढा घातला होता. त्यामुळे घरातील संसारोपयोगी साहित्य आणि घराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.घरामध्ये कोणीही वास्तव्यास नसल्याने मोठी दुर्घटना टळली. प्राथमिक अंदाजानुसार शॉर्टसर्किटमुळे आग लागली असावी, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.घटनेची माहिती मिळताच फणसवणे मंडळ अधिकारी कदम, तलाठी तसेच महसूल विभागातील संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांनी रात्रीच घटनास्थळी धाव घेतली. आगीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यात आली असून प्रत्यक्ष पंचनाम्यानंतर नुकसानीचा नेमका आकडा स्पष्ट होणार आहे.मध्यरात्रीच्या या आगीत पाटणकर कुटुंबाचे कौलारू घर आणि संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले. एका क्षणात उभ्या संसाराची राखरांगोळी झाली; मात्र घरात कोणी नसल्याने सुदैवाने मनुष्यहानी झाली नाही.



नवी मुंबईतील घणसोली येथे सिद्ध पादुकांचे गुरुपूजन संपन्न

दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थान अंतर्गत शैक्षणिक उपक्रमाच्या माध्यमातून १५० विद्यार्थ्यांना तसेच राजर्षी शाहू महाराज आश्रमशाळा, आडोशी येथील विद्यार्थ्यांना वह्या व कंपास, शालेय बॅग यांचे विनामूल्य वाटप रविवारी करण्यात आले.
प्रारंभी , जगद्गुरू श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या सिद्ध पादुकांची मिरवणूक ढोल-ताशांच्या गजरात, टाळ-मृदंगाच्या निनादात, वारकरी पथक, कलशधारी सुवासिनी अशा विविध कला परंपरांनी अलंकृत होऊन अत्यंत भक्तिभावाने संपन्न झाली.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नवी मुंबई मनपा सभागृह नेते सागर नाईक , नगरसेवक सर्वश्री लक्ष्मीकांत पाटील , अनिकेत म्हात्रे , संदीप म्हात्रे , नगरसेविका सर्वश्री पूजा पाटील , चैत्राली पाटील , अनिता मानवतकर , शुभांगी पाटील , कविता पाटील , शशिकला पाटील , ग्रामस्थ मंडळ गोठिवलीगाव अध्यक्ष पांडुरंग म्हात्रे , दौरा प्रमुख सोमदेव अप्पा, मुंबई व्यवस्थापक संदीप म्हात्रे यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.वृक्षारोपण महाअभियानांतर्गत जगद्गुरू श्रींच्या संकल्पनेतून प्रत्येक भक्ताकडून एक वृक्ष हा संकल्प राबविण्यात येत आहे. संकल्पपूर्ती अंतर्गत सुमारे सव्वा सहा लाख वृक्षारोपण पूर्ण झाले आहे. तसेच मरणोत्तर देहदान २६७ + अवयवदान २३१+, महाराष्ट्रासह अनेक राज्यांत सुमारे पावणे दोन लाख रक्तपिशव्या शासनाला सुपूर्द करण्यात आल्या आहेत.ऋणानुबंध पच्या माध्यमातून २८३७१ पेक्षा अधिक गरजू रुग्णांना वेळेवर रक्तदाते उपलब्ध करून देऊन जीवनदान देण्यात आले आहे. ५५ रुग्णवाहिका व हृदयसंजीवनी कार्डियाक रुग्णवाहिका विनामूल्य सेवा देत आहेत. तसेच विनामूल्य मोटार ड्रायव्हिंग स्कूलच्या माध्यमातून ७८५ पेक्षा अधिक युवकांना ड्रायव्हर बनवून रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. असे अनेक सामाजिक उपक्रम जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या वतीने आजतागायत सुरू आहेत.कार्यक्रमाच्या ठिकाणी भाविकांना मोफत महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.



लोकसेवेचा वसा आणि सामाजिक भान एकनाथ संपती मस्के यांचा प्रेरणादायी प्रवास

दैनिक वादळ वार्ता
माजलगाव । विजय डावरे

सामान्य कुटुंबातून पुढे येत जिद्द, संघर्ष आणि निस्वार्थ समाजसेवेच्या जोरावर जनमानसात निर्माण केली वेगळी ओळख कोणतीही राजकीय किंवा आर्थिक पार्श्वभूमी नसताना केवळ जिद्द, कष्ट आणि समाजसेवेच्या बळावर जनमानसात आपले अढळ स्थान निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे पात्रुड गावचे माजी सरपंच एकनाथ संपती मस्के होय. अत्यंत सामान्य आणि गरीब कुटुंबातून पुढे येत संघर्षाच्या वाटेवरून त्यांनी आपले आयुष्य घडवले. सामान्य परिस्थितीतून असामान्य व्यक्तिमत्त्व कसे घडते, याचे ते जिवंत उदाहरण आहेत.

एकनाथ मस्के यांचे कुटुंब अत्यंत सामान्य होते. त्यांचे वडील टपाल खात्यात पोस्टमन म्हणून प्रामाणिकपणे सेवा बजावत होते. घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे गरिबीचे चटके त्यांनी जवळून अनुभवले. मात्र, वडिलांकडून मिळालेले प्रामाणिकपणाचे संस्कार आणि कष्ट करण्याची तयारी यांच्या जोरावर त्यांनी कधीही परिस्थितीसमोर हार मानली नाही. याच संघर्षातून सर्वसामान्यांच्या अडचणी समजून घेणारे संवेदनशील व्यक्तिमत्त्व घडले. पात्रुड गावचे सरपंच म्हणून २००८ ते २०१३ या कालावधीत त्यांनी जबाबदारी सांभाळली. या कार्यकाळात गावाच्या विकासाला प्राधान्य देत पायाभूत सुविधा आणि ग्रामविकासाच्या विविध कामांसाठी प्रयत्न केले. गावाचा कारभार चालवताना पारदर्शकता, सर्वसमावेशकता आणि लोकसहभाग या बाबींना त्यांनी महत्त्व दिले. गावातील सर्व समाजघटकांना सोबत घेऊन विकासाची वाटचाल करण्याचा त्यांचा प्रयत्न राहिला.एकनाथ मस्के यांच्या सामाजिक कार्याचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी





कधीही जात, पात किंवा धर्माचा भेदभाव केला नाही. माणुसकी हाच त्यांचा धर्म राहिला आहे. गरीब, गरजू, असहाय्य आणि संकटात सापडलेल्या नागरिकांच्या मदतीसाठी ते नेहमी तत्पर असतात. कोणाच्याही अडीअडचणीत धावून जाणे आणि शक्य ती मदत करणे हा त्यांच्या स्वभावाचा महत्त्वाचा भाग आहे.कोरोना महामारीच्या कठीण काळातही त्यांनी सामाजिक जबाबदारी जपत विविध उपक्रम राबवले. नागरिकांमध्ये कोरोना जनजागृती करणे, मास्क वाटप करणे तसेच गोरगरीब कुटुंबांना स्वखर्चातून किराणा किटचे वाटप करणे अशा माध्यमातून त्यांनी गरजूंना मदतीचा हात दिला. संकटाच्या काळात सर्वसामान्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली.आज कोणत्याही मोठ्या राजकीय पदाची अपेक्षा न ठेवता एकनाथ संपती मस्के समाजातील लोकांच्या सुख-दुःखात सहभागी होत आहेत. पद असो अथवा नसो, समाजासाठी काम करण्याची त्यांची भावना कायम आहे. लोकांशी असलेला संपर्क, मदतीची तत्परता आणि सर्वांना सोबत घेऊन चालण्याची वृत्ती यामुळे त्यांनी पात्रुड परिसरात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.एकनाथ संपती मस्के यांचा जीवनप्रवास आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहे. माणूस मोठा होण्यासाठी केवळ पैसा किंवा राजकीय पदाची गरज नसते, तर प्रामाणिकपणा, जिद्द, कष्ट आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी महत्त्वाची असते, हे त्यांच्या कार्यातून दिसून येते.संघर्षातून उभे राहून समाजासाठी जगणे, माणुसकी जपणे आणि लोकांच्या अडीअडचणीत मदतीला धावून जाणे, हाच त्यांच्या जीवनाचा खरा परिचय आहे. लोकांच्या मनात निर्माण केलेला विश्वास आणि समाजसेवेचा अखंड वसा यामुळे एकनाथ संपती मस्के हे निश्चितच आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व ठरत आहेत!

३३ वर्षांच्या ग्रंथालय चळवळीतील योगदानाचा गौरव

डॉ.राजेंद्र सानप यांना राज्यस्तरीय 'ग्रंथमित्र' पुरस्कार जाहीर!

बीड जिल्ह्यातून हा पुरस्कार मिळविणारे पहिले मानकरी; सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी



ग्रंथालय क्षेत्रातील तब्बल ३३ वर्षांच्या प्रदीर्घ कार्याचा गौरव म्हणून बीड येथील डॉ. राजेंद्र मुरलीधर सानप यांना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि ग्रंथालय संचालनालयाच्या वतीने सन २०२४-२०२५ चा राज्यस्तरीय डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता अर्थात 'ग्रंथमित्र' पुरस्कार जाहीर झाला आहे. बीड जिल्ह्यातून हा प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय पुरस्कार मिळविणारे डॉ. सानप हे पहिले मानकरी ठरले आहेत.

डॉ. राजेंद्र सानप यांनी गेल्या ३३ वर्षांपासून ग्रंथालय चळवळीसाठी स्वतःला वाहून घेतले आहे. शासनाच्या 'गाव तिथे ग्रंथालय' या धोरणानुसार ग्रामीण व शहरी भागात ग्रंथालय चळवळ रुजविण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. सार्वजनिक ग्रंथालयांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर जनआंदोलनाच्या माध्यमातून संघर्ष करत ग्रंथालय क्षेत्राच्या विकासासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

ते बीड जिल्हा ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष, मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे माजी कोषाध्यक्ष तसेच महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे सदस्य आहेत. श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान, इंद्रप्रस्थ कॉलनी, बीडचे अध्यक्ष म्हणूनही ते कार्यरत आहेत. तसेच स्व. श्रीमती जानकीदेवी सानप सार्वजनिक वाचनालय, सावरगाव (घाट), ता. पाटोदा येथे सचिव आणि गुरुवर्य भगवान महाराज सार्वजनिक वाचनालय, बीडचे संस्थापक म्हणून त्यांनी कार्य केले आहे.

ग्रंथालय चळवळीच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात त्यांनी दिलेल्या योगदानाची शासनाने दखल घेतल्याने बीड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या पुरस्काराच्या घोषणेनंतर डॉ. राजेंद्र सानप यांच्यावर विविध क्षेत्रांतील मान्यवर, ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते आणि हितचिंतकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मुबलक अन्नधान्यासाठी कोणी माता आठीवटी पूजन

परंपरा । सातपुड्यातील आदिवासींमध्ये होतेय नवीन अन्नाचे पूजन

दैनिक वादळ वार्ता
मोलगी । रविंद्र वळवी



धडगाव तालुक्यातील अस्तंबा ऋषीच्या यात्रे नंतर सातपुड्यातील आदिवासी बांधव आठीवटी या अन्न धान्याच्या पारंपरिक पूजेला सुरुवात होते.दिवाळीच्या कालावधी नंतर होणाऱ्या अन्नधान्याच्या आठीवटी पूजेला सुरुवात झाली आहे.या पूजेनाला येथील भाषेत आठीवटी म्हटले जात असून कोणीमातेची नवीन अन्न धान्याची पूजा पुजारी बाबा कडून मुबलक अन्नधान्य पुरावे म्हणून पूजा केली जाते. सातपुड्यातील डोंगर दऱ्यात राहणारा आदिवासी बांधव आपल्या शेतीतील पीक पेरणी पासून त्याची काढणी होऊन सेवन होई पर्यंत विविध पूजा या अन्नधान्यासाठी केल्या जातात त्यातील आठीवटी अत्यंत महत्त्वाची पूजा जी कोणी माते साठी केली जाते.ही पूजा प्रत्येक घरी केली जाते.नवाय व आठीवटी या दोन महत्त्वाच्या पूजा आहेत नवाय ही पूजा दसरा साजरी होण्यापूर्वी व आठीवटी नंतर केली जाते.नवाय म्हणजे शेतीतील नवीन भाजी व अन्नधान्याची सेवन करण्यापूर्वी करण्यात येणारी पूजा होय.धडगांव व मोलगी परिसरात याच पूजा विधींचा सूर सर्वत्र घुमत आहे.अस्तंबाच्या शिखरावरून उतरल्या नंतर आपापल्या सवडीनुसार हे बांधव आठीवती या पूजेसाठी कुटुंबात तयारी सुरू करतात गावातील सर्व मंडळीच्या सोयीनुसार ही पूजा विधी होते .

ही पूजा रात्रीच्या वेळेस केली जात असून एका घरातील नवीन अन्नधान्य पूजेसाठी प्रथम घरातील प्रमुख व्यक्तीला पालनी करावी लागते ती पाच ते सात दिवसाची असते ही पूजा गावांतील प्रमुख पुजाऱ्या कडून करण्यात येते.आठीवटी पूजेत प्रामुख्याने साळ (तांदूळ) मोठी (कणगी) ज्वारी,मोठी भेंडी रोषा हे सुगंधित गवत,जे अस्तंबा यात्रे वरून आणले जाते,मुसड,सूप,फुलहार (महूआ)ची दारू डोवी,बेलाची पाने,पळसाची पाने सुट्टे पैसे बोत नारळ,दिवा,या संसारिक जीवनातील सर्व उपयोगी वस्तूची पूजा घरातील आरोग्य धन संपत्ती पशुधन अन्नधान्य पुरेसे वर्षभर लाभोत या करिता ही पूजा करण्यात येते.पूजेसाठी कुव्यातील,नदी तील नवीन शुद्ध पाणी सोबत ठेवून पूजेसाठी बसणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला हात धुऊन हातात बेल पाने व डोवितील फुलहार घेऊन पाती घ्यावी लागते अशी पाच किव्हा सात जणांची पूजा झाल्यावर देव पूजा संपल्यावर देवाला व धरती मातेला वंदन केले जाते. देव पाहण्यासाठी आलेल्या सर्व व्यक्तींना प्रसाद म्हणून जेवण दिले जाते अशा पद्धतीने आठीवटी ही पारंपरिक पूजा संपन्न होते.आठीवटी पूजा ही मोलगी येथील ईरमा विटला वसावे यांच्या कडे संपन्न झाली ही पूजा मोलगी येथील रोता बाबा वळवी यांच्या कडून करण्यात आली.या पूजेसाठी गावांतील महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते ईरमा वसावे, रामसिंग वसावे,कालुसिंग वसावे,दिपक वसावे,दिलीप वसावे,आपसिंग वसावे,दौल्या वळवी,पाशा वसावे,दशरथ वसावे,सामा वसावे,हात्या वसावे,आदी उस्थित होते.

वडिलांच्या स्मृती जपण्यासाठी अस्थी विसर्जनाऐवजी वृक्षारोपण!

बाविस्कर कुटुंबाचा अनोखा उपक्रम; झाडांना जाळीचे संरक्षण देत संगोपनाचा संकल्प

दैनिक वादळ वार्ता
शिर्डी । संजय महाजन



आई-वडिलांचे ऋण कधीही फेडता येत नाही. त्यांच्या आठवणी आयुष्यभर मनात जपल्या जातात. मात्र, वडिलांच्या निधनानंतर त्यांच्या स्मृती कायमस्वरूपी जतन करण्यासाठी न्याहाळोद येथील बाविस्कर कुटुंबाने एक अनोखा आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबविला आहे. वडिलांच्या तेराव्या दिवसाच्या धार्मिक विधीप्रसंगी पारंपरिक पद्धतीने नदीत अस्थी विसर्जन करण्याऐवजी वृक्षारोपण करून त्यांच्या आठवणी निसर्गाच्या सान्निध्यात जपण्याचा स्तुत्य निर्णय कुटुंबीयांनी घेतला. न्याहळोद येथील तंटामुक्त समितीचे अध्यक्ष भगवान बाविस्कर यांचे वडील नथू धुळा बाविस्कर यांचे वयाच्या ९७ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यानंतर तेराव्या दिवसाच्या विधीच्या निमित्ताने कुटुंबीयांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा वेगळा मार्ग निवडला. परिसरात ठिकठिकाणी बाबासाहेब आंबेडकर उद्यान घरासमोर तसेच शेतात खड्डे तयार करून त्यामध्ये विविध झाडांची लागवड करण्यात आली. त्यात ऑक्सिजन युक्त झालं वड पिंपळ असे विविध प्रकारचे झाडांची लागवड केली असून केवळ वृक्षारोपण करून न थांबता लावलेल्या प्रत्येक झाडाचे संरक्षण व्हावे, यासाठी झाडांभोवती जाळी लावण्यात आली आहे.

वडिलांच्या आठवणी केवळ छायाचित्रांपुरत्या मर्यादित न ठेवता त्यांनी लावलेल्या प्रत्येक झाडाच्या रूपाने त्या कायम जिवंत राहाव्यात, हा या उपक्रमामागील भावनिक विचार आहे. आज लावलेले छोटेसे रोप भविष्यात मोठा वृक्ष बनेल, त्याच्या सावलीत अनेकांना विसावा मिळेल, पक्ष्यांना निवारा मिळेल आणि पर्यावरणालाही हातभार लागेल, अशी भावना या उपक्रमातून व्यक्त होत आहे.सध्या पर्यावरणाचा समतोल बिघडत असताना वृक्षतोड, वाढते तापमान आणि पाण्याची टंचाई यांसारख्या समस्या गंभीर होत आहेत. अशा परिस्थितीत वाढदिवस, विवाह सोहळे किंवा विविध कार्यक्रमांप्रमाणेच दुःखाच्या प्रसंगातही वृक्षारोपणासारखा उपक्रम राबविता येतो, हे बाविस्कर कुटुंबाने कृतीतून दाखवून दिले आहे.विशेष म्हणजे, झाडे लावणे हा या उपक्रमाचा केवळ पहिला टप्पा असून, त्यांचे नियमित संगोपन करणे, पाणी देणे आणि जनावरांपासून संरक्षण करणे यासाठीही कुटुंबीयांनी पुढाकार घेतला आहे. लावलेली झाडे मोठी होईपर्यंत त्यांची काळजी घेण्याचा संकल्प त्यांनी केला आहे.

आठवणींना वृक्षरूप देणारा उपक्रम!

वडिलांच्या निधनानंतर त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी अनेक मार्ग असतात. मात्र, बाविस्कर कुटुंबाने वृक्षारोपणाचा मार्ग निवडून सामाजिक आणि पर्यावरणपूरक संदेश दिला आहे. प्रत्येक कुटुंबाने आपल्या घरातील शुभकार्य किंवा दुःखद प्रसंगाच्या निमित्ताने एक तरी झाड लावून त्याचे संगोपन केले, तर गावाचा परिसर हिरवागार होण्यास निश्चितच मदत होईल.बाविस्कर कुटुंबाचा हा उपक्रम न्याहाळोद गावासह परिसरातील नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरत असून, वडिलांच्या आठवणी वृक्षांच्या रूपाने जिवंत ठेवण्याचा हा अनोखा प्रयत्न खऱ्या अर्थाने समाजापुढे आदर्श निर्माण करणारा आहे.

ॲड.राजीव देशमुख यांची बीड जिल्हा परिषद पॅनलवर निवड

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी



केज तालुक्यातील वरपगावचे प्रसिद्ध डॉक्टर तात्यासाहेब रंगनाथराव देशमुख यांचे चिरंजीव अड. राजीव देशमुख यांची बीड जिल्हा परिषदेच्या स्वीकृत विधीज्ञ पॅनल वर नियुक्ती झाली आहे बीड जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्हापरिषदेची बाजू औरंगाबाद उच्च न्यायालय खंडपीठात मांडण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे.अड. राजीव देशमुख हे गेल्या ३० वर्षापासून औरंगाबाद उच्च न्यायालय खंडपीठात एक निष्णांत वकील म्हणून काम करत आहेत.ते सध्या जिल्हा परिषद संभाजीनगर, गोदावरी मराठवाडा सिंचन विकास महामंडळ व म्हाडाचे वकील म्हणूनही औरंगाबाद उच्च न्यायालय खंडपीठात काम पाहत आहेत.

तसेच यापूर्वी त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर,आरोग्य विद्यापीठ,नाशिक आणि जिल्हा परिषद, हिंगोलीच्या वतीने वकील म्हणून प्रत्येकी तीन वर्ष उच्च न्यायालय खंडपीठात चांगले काम पाहिले आहे. त्याचाच परिपाक म्हणून त्यांची बीड जिल्हा परिषदेच्या स्वीकृत विधीज्ञ पॅनल वर नियुक्ती झालेली आहे.त्यांच्या या नियुक्तीबद्दल त्यांचे वरपगाव ग्रामस्थांच्या वतीने हार्दिक अभिनंदन करण्यात आले आहे.विधी व न्याय क्षेत्रात त्यांचा नावलौकिक आहेच तो आणखी वृद्धिंगत व्हावा हीच या निमित्त सर्वांच्या वतीने हार्दिक अभिनंदन अशा शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.त्यांच्या या नियुक्तीमुळे वरपगावच्या नावलौकिकात भर पडली असून त्यांच्या वर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दुष्काळाच्या काळोखात शेतकऱ्यांच्या अंगणात शिवसेनेने फुलविला दिवाळीचा आनंद

दैनिक वादळ वार्ता
जालना । प्रतिनिधी

यंदाच्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, अनेक कुटुंबांच्या घरात दिवाळीचा आनंदही चिंतेच्या सावटाखाली आहे. अशा कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होत त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा संवेदनशील उपक्रम शिवसेनेच्या वतीने गोषेगाव येथे राबविण्यात आला. शेतकऱ्यांसोबत दिवाळी साजरी करून गरजू शेतकरी कुटुंबांना दिवाळी शिधा, किराणा किट आणि भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले.शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रवीण संतराम फुके पाटील यांच्या पुढाकारातून गोषेगाव येथील मंदिर परिसरात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. दुष्काळामुळे अडचणीत आलेल्या शेतकरी कुटुंबांना सणासुदीच्या काळात आधार मिळावा आणि त्यांच्या घरातही दिवाळीचा आनंद निर्माण व्हावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.यंदा पिकांचे नुकसान आणि आर्थिक अडचणींमुळे शेतकरी कुटुंबांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अशा वेळी सामाजिक बांधिलकी जपत शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे ही काळाची गरज आहे. याच भावनेतून शिवसेनेच्या वतीने मदतीचा हात पुढे करण्यात आला. शिधा आणि किराणा किट मिळाल्याने शेतकरी महिला व कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद दिसून आला.

यावेळी बोलताना शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रवीण संतराम फुके पाटील म्हणाले की, यंदा दुष्काळामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. अनेकांची पिके हातची गेली असून, कुटुंबाचा उदरनिर्वाह करताना त्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत गोषेगावातील शेतकरी बांधवांच्या घरात दिवाळीचा आनंद टिकून राहावा, यासाठी हा छोटासा प्रयत्न केला आहे. शेतकरी कधीही एकटा नाही, शिवसेना त्यांच्या सुख-दुःखात खंबीरपणे पाठीशी उभी आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली.या उपक्रमामुळे गरजू शेतकरी कुटुंबांना दिवाळीच्या सणात दिलासा मिळाला. राजकीय आणि सामाजिक कार्याच्या पलीकडे जाऊन गरजूंच्या अडचणीच्या काळात मदतीचा हात देणे, हीच खरी सामाजिक बांधिलकी असल्याची भावना या उपक्रमातून व्यक्त झाली. ग्रामस्थांनीही शिवसेनेच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रवीण फुके पाटील, कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव इंगळे, मधुकर जाधव, किशोर मोहिते, विकास सोरमारे, कृष्णा मोहिते, शिवाजीबापू इंगळे, रावसाहेब आप्पा इंगळे, रावसाहेब सोरमारे, अमोल मोहिते, शुभम मोहिते, शिवनाथ सोरमारे, पांडुरंग घोडे, संभाजी मोहिते, राहुल मोहिते आणि अर्जुन वाकेकर यांच्यासह शिवसैनिक व ग्रामस्थ उपस्थित होते. दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकरी कुटुंबांच्या चेहऱ्यावर दिवाळीच्या निमित्ताने आनंद फुलविणारा हा उपक्रम माणुसकी, सामाजिक संवेदना आणि शेतकऱ्यांप्रती असलेल्या बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण ठरला.

कोट्यवधींची घरे बांधली! पण चाव्यांना कोणाचे ग्रहण लागले?

दैनिक वादळ वार्ता
सुनिल गेडाम । सिंदेवाही

इमारती तयार, खोल्या सज्ज, कर्मचारी मात्र बेघर सिंदेवाही तहसील प्रशासनाचा अजब कारभार,मुख्यालयी वास्तव्याच्या नियमांना प्रशासनच हरताळ फासत आहे काय?

रेती तस्करीवर नियंत्रणासाठी अधिकारी-कर्मचारी मुख्यालयी असणे गरजेचे मग मग सरकारी निवासस्थानांचे वाटप रखडले तरी का? पाणी कुठ मुरत आहे. सरकारी तिजोरीतून निधी आला... बांधकामाला मंजुरी मिळाली... कंत्राटदाराने इमारती उभ्या केल्या... खोल्या तयार झाल्या... मात्र कर्मचाऱ्यांना त्या घरांत प्रवेश देण्याची वेळ आली की प्रशासनाच्या कार्यवाहीला अचानक ब्रेक लागला! हा नेमका प्रशासकीय विलंब आहे की निर्णय घेण्याची अनिच्छा? सिंदेवाही तहसील कार्यालयाच्या मागील बाजूस उभारण्यात आलेल्या कर्मचारी निवासस्थानांकडे पाहिल्यानंतर सर्वसामान्य नागरिकांच्या मनात हा प्रश्न निर्माण होत आहे.सरकारी इमारती उभ्या राहिल्या, शासनाचा निधी खर्च झाला; पण त्या इमारतींचा प्रत्यक्ष उपयोग सुरू करण्याची वेळ आली की प्रशासनाची चाके का थांबली? बांधकाम पूर्ण करण्यासाठी यंत्रणा सक्रिय होती, मग चाव्या कर्मचाऱ्यांच्या हातात देण्यासाठी तीच यंत्रणा निष्क्रिय का? एकीकडे कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहावे, नागरिकांच्या तक्रारींना तत्काळ प्रतिसाद द्यावा, कार्यालयीन कामकाजात तत्परता ठेवावी, असे आदेश आणि अपेक्षा व्यक्त केल्या जातात. दुसरीकडे मुख्यालयी राहण्यासाठी सरकारी निवासस्थाने तयार असतानाही त्यांचे वाटप होत नसेल, तर प्रशासनाच्या या दुटप्पी कार्यपद्धतीचा अर्थ काय घ्यायचा?

सिंदेवाही तालुक्यात अवैध रेती उत्खनन आणि वाहतुकीचा प्रश्न नेहमीच चर्चेत असतो. महसूल प्रशासनाची सतर्कता, अधिकाऱ्यांची उपलब्धता आणि कर्मचाऱ्यांची तत्परता अशा परिस्थितीत अत्यंत महत्त्वाची ठरते. अधिकारी-कर्मचारी मुख्यालयी वास्तव्यास असतील, तर रात्री-अपरात्री मिळणाऱ्या तक्रारींवर लक्ष देणे, अवैध वाहतुकीची माहिती मिळताच घटनास्थळी पोहोचणे आणि महसूलविषयक कारवाई करणे अधिक प्रभावी होऊ शकते.मग प्रश्न असा आहे की, कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहण्यासाठी घरे उपलब्ध करून देण्यात



प्रशासनाला अडचण नेमकी कोणती?

कर्मचारी मुख्यालयी राहिल्यास रेती तस्करीवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी अधिक प्रभावीपणे पार पाडावी लागेल, अशी कोणाला भीती वाटते काय? की या निवासस्थानांच्या वाटपाला अडथळा आणणारे काही वेगळेच प्रशासकीय कारण आहे?हा आरोप नसून प्रशासनाने स्पष्ट उत्तर द्यावे, असा जनतेचा रास्त सवाल आहे. कारण सरकारी निवासस्थाने बांधूनही ती कर्मचाऱ्यांना उपलब्ध न करून देण्यामागील कारण जनतेला समजले पाहिजे.निवासस्थाने तयार असताना ती वापरात का आणली जात नाहीत? त्यांचे बांधकाम पूर्णत्व प्रमाणपत्र मिळाले आहे का? वीज-पाणी सुविधा उपलब्ध आहेत का? वरिष्ठ कार्यालयाची मंजुरी प्रलंबित आहे का? पात्र कर्मचाऱ्यांचे वाटप निश्चित झाले आहे का?

की चाव्या कोणाला द्यायच्या, याचा निर्णय घेण्यासाठी फाईलला तहसील कार्यालयाच्या टेबलावरच मुहूर्ताची प्रतीक्षा करावी लागत आहे?

सरकारी इमारती बांधणे म्हणजे विकास नव्हे त्या जनतेच्या उपयोगात आणणे म्हणजे खरा विकास! अन्यथा जनतेच्या पैशातून उभ्या राहिलेल्या इमारतींमध्ये माणसांऐवजी धूळ आणि कोळ्यांची जाळीच वास्तव्य करणार का?

तर प्रशासनाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे स्वाभाविक आहे.

बांधकामाला मुहूर्त मिळाला, निधीला मंजुरी मिळाली, कंत्राटदाराने काम पूर्ण केले; मग कर्मचाऱ्यांना चाव्या देण्यासाठी कोणत्या शुभमुहूर्ताची वाट पाहिली जात आहे?सरकारी घरे कर्मचाऱ्यांच्या सोयीसाठी बांधली आहेत की केवळ सरकारी यंत्रणेच्या निष्क्रियतेचे स्मारक म्हणून उभी केली आहेत?

घरांना कुलूप लावून प्रशासनाची जबाबदारी पूर्ण होत नाही त्या घरांत कर्मचारी राहू लागले, तेव्हाच सरकारी खर्चाचे सार्थक होईल!

आता आश्वासन नको, तर निवासस्थानांच्या चाव्या कर्मचाऱ्यांच्या हातात कधी पडणार याची ठोस तारीख हवी आहे.

जुन्या आठवणींना उजाळा अन् शाळेच्या ऋणातून उतराई माजी विद्यार्थ्यांकडून वसतिगृहासाठी बोरवेलची भेट

महाराष्ट्र विद्यालय, बनसारोळा येथे २०१०-११ च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
बनसारोळा । राजकुमार धिवार

केज तालुक्यातील बनसारोळा येथील महाराष्ट्र विद्यालयात सन २०१०-२०११ या शैक्षणिक वर्षातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात संपन्न झाला. अनेक वर्षांनंतर पुन्हा एकदा शाळेच्या प्रांगणात एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत शालेय जीवनातील रम्य क्षण पुन्हा अनुभवले. शाळेतील वर्गखोल्या, शिक्षकांचे मार्गदर्शन, मित्र-मैत्रिणींसोबत घालवलेले आनंदाचे क्षण, शालेय जीवनातील गमतीजमती अशा अनेक आठवणींना उजाळा देताना उपस्थित विद्यार्थी भावूक झाले. अनेक वर्षांनंतर झालेल्या या भेटीमुळे जुन्या मैत्रीला नव्याने उजाळा मिळाला. एकमेकांच्या सुख-दुःखांची विचारपूस करत मैत्रीचे ऋणानुबंध अधिक घट्ट करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेप्रती



आणि गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. या स्नेहमेळाव्याचे विशेष आकर्षण म्हणजे माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी बोअरवेलची सुविधा उपलब्ध करून दिली. शिक्षण घेतलेल्या शाळेचे ऋण जपण्याच्या भावनेतून माजी विद्यार्थ्यांनी घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद ठरत असून, त्यांच्या या सामाजिक बांधिलकीचे उपस्थितांनी स्वागत केले. केवळ आठवणींमध्ये रमण्याऐवजी आपण ज्या शाळेत शिकलो, त्या शाळेच्या उपयोगी पडावे, ही भावना या उपक्रमातून व्यक्त झाली.या स्नेहमेळाव्यास नरेंद्र काळे साहेब, भागवतदादा गोरे, प्रकाश बोरगावकर सर, तेलंग सर, गरड सर, तानाजी जोगदंड सर, प्रभाकर लांडगे सर, चव्हाण सर, दत्तात्रय काकडे सर, केशव काकडे सर, रंगनाथ काकडे सर यांच्यासह माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जुन्या आठवणींचा सुगंध, गुरुजनांचा सन्मान, मित्रमैत्रिणींचा जिव्हाळा आणि शाळेसाठी केलेले सामाजिक योगदान यामुळे महाराष्ट्र विद्यालयातील हा स्नेहमेळावा केवळ पुनर्भेट न ठरता सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण करणारा अविस्मरणीय सोहळा ठरला.

देवस्थान इनाम जमीन प्रश्नी २५ नोव्हेंबरला महसूलमंत्र्यांच्या घरासमोर थाळी बजाव आंदोलन

दैनिक वादळ वार्ता
अहिल्यानगर । कमलेश शेवाळे

महाराष्ट्र राज्यातील देवस्थान इनाम जमीन धारक शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी येत्या २५ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मुंबईतील मलबार हिल येथील निवासस्थानासमोर 'थाळी बजाव' आंदोलन करण्यात येणार आहे. देवस्थान इनाम जमीन कृती समितीच्या वतीने या आंदोलनाची हाक देण्यात आली आहे.

१९५३ च्या कायद्यानुसार इतर सर्व इनामे खालसा झाली, मात्र देवस्थान इनाम जमीन आजही 'वर्ग-२' मध्येच आहे. यामुळे इनामधारक शेतकऱ्यांना पीक कर्ज, पीक विमा आणि नैसर्गिक आपत्तीची नुकसान भरपाई मिळत नाही. जोगळेकर मॅन्युअल आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार या जमिनींवर पुजारी, अर्चक, गुरव आणि सनदधारक इनामदारांचाच अधिकार आहे. असे असतानाही राज्यात अनेक ठिकाणी वारस नोंदी आणि विरासत कार्यवाही वर्षानुवर्षे प्रलंबित आहे.

तसेच, या जमिनींबाबत कायदा करण्यासाठी



शासनाने नेमलेल्या समितीत इनामधारक शेतकऱ्यांचा एकही प्रतिनिधी घेतलेला नाही, त्यामुळे एकतर्फी कायदा होण्याची भीती समितीने व्यक्त केली आहे. वारंवार पत्रव्यवहार करूनही सरकार दखल घेत नसल्याने हे आंदोलन पुकारण्यात आले आहे.

अखिल भारतीय गुरव समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. अण्णासाहेब शिंदे, परशुराम हिंदू सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विश्वजीत देशपांडे, दशनाम गोसावी समाज परिषदेचे अध्यक्ष ओमप्रकाश गिरी आणि मराठवाडा इनाम हक्क परिषदेचे अध्यक्ष ड. राजेंद्र बन यांनी या आंदोलनात राज्यातील सर्व इनामधारक शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

रेशन बंद करण्याआधी सरकारने स्वत:चं पोट कमी करावं

गरिबाचा घास हिरावू नका-शेख युनूस

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी

ऐन दुष्काळात गरीबाच्या ताटातला घास हिरावून घेण्याचा प्रकार बीड जिल्ह्यात समोर आला आहे. प्रशासनाच्या नव्या निष्कर्षामुळे जिल्ह्यातील तब्बल १ लाख ६० हजार लाभार्थ्यांचे रेशन बंद होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे गरीब कुटुंबामध्ये संतापाची लाट उसळली आहे.

बागायती जमीन आहे, ट्रॅक्टर आहे, लाखाचा व्यवहार आहे, अशा कारणावरून हजारो खऱ्या गरीब लाभार्थ्यांची नावे रेशन यादीतून वगळण्यात येत आहेत. प्रत्यक्षात दुष्काळाने होरपळलेल्या या कुटुंबाकडे पोट भरण्यासाठी ही पैसे नाहीत. अशी स्थिती आहे.

सरकारच्या मंत्र्याचे पगार, भत्ते, गाड्या, बंगले, दौरे यावर कोट्यावधी रुपये खर्च



होतात, त्यावर कधीच कात्री का लावत नाही? पण गरिबाला मिळणाऱ्या ५ किलो धान्यावर मात्र सरकारला काटकसर सुचते, असा सवाल सामाजिक कार्यकर्ते तथा स्वतंत्र पत्रकार शेख युनूस यांनी केला आहे. पुढे ते म्हणाले की, रेशन बंद करण्याआधी सरकारने आधी स्वतःचा खर्च कमी करावा, मंत्र्याचे शाही थाट कमी करावेत, पण गरीबाचा घास हिरावून घेऊ नये, दुष्काळामुळे शेतात काही पिकले नाही. मजुरी नाही, काम नाही. अशावेळी रेशनचाच आधार होता, तोच आधार हिरावला तर गरिबांनी जगावं कसं, असा प्रश्न लाभार्थ्यांनी उपस्थित केला आहे. या प्रश्नाची दखल लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना, पत्रकार आणि सर्व जागरूक नागरिकांनी घेतली पाहिजे. अन्यथा दुष्काळात गरीब उपाशी मरेल. आणि सरकार मात्र निष्कर्षाच्या खेळात गुंतलेले राहील. गरीबाचे रेशन तात्काळ सुरू ठेवावे, चुकीच्या पद्धतीने वगळलेली नावे पुन्हा समाविष्ट करावीत, अशी मागणी सरकारला शेख युनूस यांनी केला.

सीमा वेगळी, भाषा वेगळी माणुसकीचा धर्म मात्र एकच

दैनिक वादळ वार्ता
माजलगाव । विजय डावरे

नेपाळमधील कर्करोगग्रस्त रुग्णावर माजलगाव येथील गुरुकृपा होलिस्टिक कॅन्सर वेलनेस आरोग्यधाम अंतर्गत यशवंत रुग्णालयात यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. मोठ्या आतड्याच्या कर्करोगाने त्रस्त असलेल्या या रुग्णावर तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने तब्बल दोन तास शस्त्रक्रिया करून ट्युमर यशस्वीरीत्या काढला. दिल्लीतील रुग्णालयात या शस्त्रक्रियेसाठी ५ ते ७ लाख रुपयांचा खर्च सांगण्यात आला होता. मात्र, गुरुकृपाचे संस्थापक डॉ. यशवंत राजेभोसले यांनी अत्यल्प खर्चात उपचार करण्यासाठी पुढाकार घेतला. परदेशी नागरिक असल्याने शासकीय आरोग्य योजनांचा लाभ मिळण्यास मर्यादा असतानाही त्यांनी माणुसकीच्या भावनेतून उपचार केले.



या शस्त्रक्रियेत प्रसिद्ध सर्जन डॉ. युवराज कोल्हे, डॉ. महेश काळे, भूलतज्ज्ञ डॉ. शिवाजीराव काकडे आणि डॉ. यशवंत राजेभोसले यांच्या पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली. विशेष म्हणजे, पुढील किमोथेरपी, रेडिएशन आणि आयुर्वेदिक पंचकर्म उपचारांसाठीही माजलगाव येथेच येणार असल्याचे रुग्ण व त्यांची मुलगी निकिता जैन यांनी सांगितले. या घटनेमुळे माजलगावच्या ग्रामीण आरोग्यसेवेची ओळख देशाच्या सीमा ओलांडून नेपाळपर्यंत पोहोचली असून, ग्रामीण भागातही दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध होऊ शकते, हे अधोरेखित झाले आहे.

ऊसाला पहिली उचल ३५०० मिळेपर्यंत कारखाने बंद ठेवा

दैनिक वादळ वार्ता
माढा (वृत्तसंस्था)

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टींच्या इशाऱ्यानंतर सोलापुरातील शेतकऱ्यांनी ऊसाची वाहतूक रोखण्यास सुरुवात केली आहे. सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील शेतकरी आक्रमक झाले आहेत, वाहतूक सुरू ठेवली तर ट्रॅक्टरची टायर फोडली जातील असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. जोपर्यंत ऊसाला पहिली उचल ३५०० रुपये मिळत नाही तोपर्यंत कारखाने बंद ठेवण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. १९ तारखेला पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखानदारांची बैठक होणार आहे. या बैठकीत ३५०० रुपयांचा दर जाहीर नाही केला तर अधिक तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. १९ तारखेपर्यंत साखर कारखान्यांनी ऊसाची तोडणी बंद करावी, अशा आशयाचे पत्रक देखील सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून काढण्यात आले आहेत.

तर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टींनी सोशल मिडीयावरती पोस्ट माहिती देताना सांगितलं की, १९ नोव्हेंबर सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर आरपारची लढाई होणार आहे. सोलापूर जिल्ह्यातील कारखानदारांनी तोडगा मान्य न केल्यास सोलापूर जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीय महामार्ग व सोलापूर रेल्वे स्टेशनवर रेल्वे रोको आंदोलन केलं जाणार आहे. यामुळे सोलापूर जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी लाखोच्या संख्येने सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथे उपस्थित रहावे, असं आवाहन राजू शेट्टींनी केलं आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077